मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथील रिट याचिका क्र.६१९२/२०१७ च्या अनुषंगाने समर्थ रामदास हायस्कूल, अरोली, ता.मौदा, जि.नागपूर या शाळेच्या इमारत भाडयाबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र-१३१८/प्र.क्र.२२१/ एस एम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १३ मार्च, २०१९

संदर्भ :

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांचे क्र.अमाशा/इ.भाडे/२१२६६/१८-१९/माध्य-ब/३०३/१०८७९, दि.२६/११/२०१८ चे पत्र
२) सहायक सरकारी वकील, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे क्र.१८२४०/डब्ल्युपी/एआरसी/२०१८, दि.०३/११/२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :

समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, अरोली, जि.नागपूर ही अनुदानित शाळा श्रीमती देविकाबाई कुंभलकर व श्री.देवराम कुंभलकर यांच्या खाजगी इमारतीत जून,१९९७ पासून भरत आहे. सदर शाळेच्या इमारत भाडयाची प्रलंबित रक्कम १२ टक्के व्याजासहीत मिळणेबाबत इमारत मालकांनी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र.६१९२/२०१७ दाखल केली आहे. सदर रिट याचिकेवरील अंतरिम सुनावणी दरम्यान मा.न्यायालयाने सदर प्रकरणी शासनास केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. यबाबत, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.२६/११/२०१८ अन्वये सादर केलेला इमारत भाडयाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

समर्थ हायस्कूल, अरोली, ता.मौदा, जि.नागपूर या शाळेसाठी, श्रीमती देवीकाबाई कुंभलकर, यांच्या खाजगी मालकीच्या इमारतीचे दि.१ जून, १९९७ पासून ३१ डिसेंबर, १९९९ पर्यंतच्या व श्री.देवराम कुंभालकर यांच्या मालकीच्या खाजगी इमारतीचे दिनांक ०१ एप्रिल, १९९८ पासून दिनांक ३१ डिसेंबर, १९९९ पर्यंतच्या कालावधीतील इमारत भाडे अदा करण्यास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

श्रीमती देवीकाबाई कुंभलकर, यांना दिनाक १ जून, १९९७ ते दिनांक ३१ डिसेंबर, १९९९ या कालावधीत प्रतीमाह रु.६०१०/- याप्रमाणे एकूण ३१ महिन्यांचे इमारत भाडे रक्कम रु.१,८६,३१०/- (अक्षरी रुपये एक लक्ष शहाऐंशी हजार तीनशे दहा फक्त) अदा करण्यास मान्यता

देण्यात येत आहे. तसेच, श्री.देवराम कुंभलकर यांना दिनांक १ एप्रिल, १९९८ ते दिनांक ३१ डिसेंबर, १९९९ या कालावधीसाठी प्रतिमाह रु.१०२३५/- याप्रमाणे एकूण २१ महिन्यांचे इमारत भाडे रु.२,१४,९३५/- (अक्षरी रुपये दोन लक्ष, चौदा हजार, नऊशे पस्तीस फक्त) अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सबब एकूण रक्कम रु.४,०१,२४५/- (अक्षरी रुपये चार लक्ष, एक हजार, दोनशे पंचेचाळीस फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास याद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका विचारात घेऊन, इमारत भाडे मंजूरीची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

३. याकरीता होणारा खर्च " ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२- माध्यमिक शिक्षण, (००) (०१) - सर्वसाधारण माध्यमिक, (२२०२ २४९९), शाळांना सहायक अनुदान, ३१ - सहायक अनुदान (भारीत)" या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका भाग-पहिला, उपविभाग एक-अ क्र.१०, नियम क्र.११५ आणि आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील नियम क्र.१४७ (क) खालील टिप-१ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१७६/व्यय-५, दिनांक २०/०२/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने काढण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१३११४४४६०६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2019.03.13 11:47:45 +05'30'

(स्वा.म.नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर
५) लेखा अधिकारी, कोषागार कार्यालय, नागपूर
६) निवडनस्ती (एस एम-१)